(इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णयाचा मराठी भाषेत अनुवाद)

**[१९९६]) ३ एस. सी. आर. ६७१**

**राकेश कुमार सिंग**
- विरुद्ध –
**दि कमिटी ऑफ मॅनेजमेंट, रायबरेली**

**२० मार्च, १९९६**

**[ एस. सी. अगरवाल आणि जी. टी.नानावटी, न्या. न्या.]**

उत्तर प्रदेश इंटरमीडिएट शिक्षण अधिनियम, १९२१ : कलम १६- सी.

विनियम २५ - ची अर्थउकल.

कर्मचारी - परिवीक्षाधीन – परिवीक्षा कालावधीत सेवा समाप्ती - नोटीस किंवा त्या ऐवजी एक महिन्याच्या वेतनाची तरतूद - भरणा करण्याची पद्धत आणि वेळ विहित केलेली नाही - नोटीस न देता आणि त्या ऐवजी वेतन देऊन, सेवा समाप्ती विधिग्राह्य - परंतु कर्मचारी नोटीसच्या अवधीसाठी वेतन मिळण्यासाठी हक्कदार असल्याचा निर्णय दिला.

उत्तरवादी - समिती द्वारा संचालीत महाविद्यालयात अधिव्याख्याता असलेल्या अपीलकर्त्याची सेवा परिवीक्षा कालावधीत समाप्त करण्यात आली. उत्तर प्रदेश इंटरमीडिएट शिक्षण अधिनियम, १९२१ च्या कलम १६-सी खाली तयार केलेल्या विनियमनातील विनियम २५ नुसार अपेक्षित असल्याप्रमाणे एक महिन्याची नोटीस किंवा नोटीसच्याऐवजी एक महिन्याचे वेतन, या दोहोंपैकी एकही अपीलकर्त्याला दिले नाही या कारणास्तव शिक्षण उपसंचालक यांनी सेवा समाप्ती विधिअग्राह्य ठरवली. उच्च न्यायालयाने, (एक) जरी एक महिन्याची नोटीस देणे किंवा त्या ऐवजी एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक होते, तरी ते विनियम २५ खालील शक्तींचा वापर करण्यासाठी पूर्ववर्ती शर्थ नव्हते; आणि (दोन) नोटीस न देता किंवा त्या ऐवजी वेतन देऊन सेवा समाप्त केल्यास, सेवा समाप्तीचा आदेश विधिअग्राह्य ठरणार नाही, परंतु ते केवळ कर्मचाऱ्यास एक महिन्याचे वेतन मिळण्यास हक्क देईल असा निर्णय देऊन उपसंचालकांचा आदेश रद्द केला. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरुद्ध या न्यायालयासमोर अपील दाखल करण्यात आले.

या न्यायालयाने अपील फेटाळून, निर्णय दिला कि:

१. उच्च न्यायालयाने घेतलेला दृष्टिकोन बिनचूक आहे. विनियम २५ एक महिन्याची नोटिस देणे किंवा त्या ऐवजी एक महिन्याचे वेतन देणे या दोहोंपैकी एक पर्याय व्यवस्थापनास देते. ते प्रदान करण्याची पद्धत किंवा वेळ उपबंधित करत नाही. ते केवळ अस्थायी कर्मचाऱ्याला किंवा परिवीक्षाधीनाला नोटीसच्या अवधीसाठी त्याचे वेतन मिळण्याचा अधिकार देते. परिणामकारक सेवेच्या समाप्तीसाठी पूर्ववर्ती शर्थ म्हणून नोटीसच्या ऐवजी एक महिन्याचे वेतन प्रदान करण्याचे विनियम २५ उपबंधित करीत नसल्यामुळे, ज्या शिक्षण उपसंचालकांनी विरुद्ध मत व्यक्त केले होते, त्यांचा आदेश रद्द करण्यात उच्च न्यायालय बरोबर होते. (६७७-बी-डी)

२. जेव्हा नियम सेवा समाप्तीच्या नोटीसच्या ऐवजी वेतन देण्यास परवानगी देतो आणि ते केव्हा प्रदान करायचे याबाबत आणखी उपबंधित करत नाही, तेव्हा तो केवळ कर्मचाऱ्याला नोटीसच्या अवधीसाठी वेतन मिळण्याचा अधिकार देतो आणि नोटिस ऐवजी वेतन प्रदान करणे यास विधिग्राह्य रीतीने सेवा समाप्तीसाठी पूर्ववर्ती शर्थ म्हणून मानले जाऊ शकत नाही. परंतु जिथे अभिप्रेत अर्थाने देखील नियम उपबंधित करतो कि कर्मचाऱ्याला त्याला जे काही देय आहे ते प्रदानासह सेवेची समाप्ती एकाच वेळी करावयास पाहिजे, तिथे त्या आवश्यकतेची पूर्तता विधी ग्राह्य सेवा समाप्तीसाठी पूर्ववती शर्थ म्हणून मानली गेली पाहिजे. [६७६-जी-एच; ६७७-ए]

उत्तर प्रदेश राज्य - विरुद्ध - दिनानाथ राय, (१९६९) एस. एल. आर. ६४७, यावर अवलंबून होते.

व्यवस्थापकीय समिती, सोहनलाल उच्च माध्यमिक शाळा - विरुद्ध - शिव दत्त गुप्ता, (१९७४) ए. एल. जे. ४६५ आणि वरिष्ठ अधीक्षक, आर. एम. एस. कोचीन - विरुद्ध - के. व्ही. गोपीनाथ, (१९७३) ३ एस. सी. सी. ८६७ = ए. आय. आर. (१९७२) एस. सी. १८७, उल्लेखनीय.

संचालक, तंत्रशिक्षण - विरुद्ध - जान मोहम्मद, (१९७५) ऑल एल. आर. 8, संदर्भित.

दिवाणी अपीलिय अधिकारिता : दिवाणी अपील क्र. २४४८/१९७८.

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या दिवाणी संकीर्ण रिट याचिका क्रं. ३१७१/१९७२ मधील दिनांक १५. १२.७७ रोजीचे न्यायनिर्णय आणि आदेश यातून.

अपीलकर्त्यासाठी: प्रमोद स्वरूप, सुश्री परीना स्वरूप आणि प्रशांत चौधरी.

उत्तरवादीसाठी: आर. बी. मिश्रा, अधिवक्ता (एन. पी.)

न्यायालयाचा निर्णय दिला गेला

**न्यायमूर्ती नानावटी** : अपीलकर्त्याला ६ ऑगस्ट, १९७० पासून एका वर्षाच्या कालावधीसाठी उत्तरवादी क्रं. १ यांच्या द्वारा संचालित महाविद्यालयात परिवीक्षाधीन अधिव्याख्याता म्हणून नियुक्त करण्यात आले होते. मे १९७१ मध्ये, महाविद्यालयाच्या प्राचार्यानी व्यवस्थापनला अहवाल सादर केला की अपीलकर्त्याची कामगिरी समाधानकारक नाही आणि तो सेवेत राहण्यास योग्य नाही. व्यवस्थापनाने दिनांक २०, जून १९७१ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीत तो अहवाल विचारात घेतला आणि अपीलकर्त्याची सेवा समाप्त करण्याबद्दल ठराव मंजूर केला. उत्तर प्रदेश इंटरमीडिएट शिक्षण अधिनियम, १९२१ खाली महाविदयालय मान्यताप्राप्त शिक्षण संस्था असल्याने, अपीलकर्त्याची सेवा परिणामकारक रीतीने समाप्त करण्यासाठी जिल्हा शाळा निरीक्षकाची पूर्व मान्यता आवश्यक होती आणि म्हणून, व्यवस्थापनाचा ठराव-नि-प्रस्ताव संबंधित जिल्हा निरीक्षकांकडे पाठवण्यात आला. त्यावर विचार केल्यानंतर, जिल्हा निरीक्षकांनी त्यांच्या दिनांक ५ जुलै, १९७१ रोजीच्या आदेशान्वये मान्यता दिली. त्यानंतर, व्यवस्थापनाने दिनांक ६ जुलै, १९७१ रोजी याचिकाकर्त्याची सेवा समाप्त केली. अपीलकर्त्याने शिक्षण उपसंचालक यांच्याकडे अपील दाखल केले. त्यांनी दिनांक १५ मार्च, १९८२ रोजीच्या आदेशान्वये अपील मंजूर केले आणि अधिनियमाच्या कलम १६-सी खाली तयार केलेल्या विनियमनातील विनियम २५ नुसार अपेक्षित असल्याप्रमाणे एक महिन्याची नोटीस किंवा त्या ऐवजी एक महिन्याचे वेतन या दोहोंपैकी एकही अपीलकर्त्याला दिले नाही या कारणास्तव सेवा समाप्ती विधिअग्राह्य ठरविली.

त्या आदेशाच्या विरुद्ध, व्यवस्थापनाने अलाहाबाद उच्च न्यायालयात रिट याचिका, अर्थात, दिवाणी संकीर्ण रिट याचिका क्रं. ३१७१/१९७२ दाखल केली. उच्च न्यायालयासमोर हे विवादग्रस्त नव्हते की विनियम २५, जे खालीलप्रमाणे आहे,

"२५. अस्थायी कर्मचाऱ्यांची (परिविक्षाधीन वगळून) किंवा परिवीक्षाधीनाची, त्यांच्या परिवीक्षा कालावधीत, सेवा, केव्हाही त्याला एक महिन्याची नोटीस देऊन किंवा त्या ऐवजी एक महिन्याचे वेतन देऊन समाप्त करता येऊ शकेल.",

लागू होते. हे सुद्धा विवादग्रस्त नव्हते कि अपीलकर्त्याला एक महिन्याची नोटीस किंवा त्या ऐवजी एक महिन्याचे वेतन या दोहोंपैकी एकही दिले नव्हते. उच्च न्यायालयाने, विनियम २५ चा अन्वयार्थ लावून निर्णय दिला कि जरी एक महिन्याची नोटीस देणे किंवा त्या ऐवजी एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक असले तरी ते त्या विनियमनाखाली शक्तींचा वापर करण्यासाठी पूर्ववर्ती शर्थ नाही आणि म्हणून, जरी एक महिन्याची नोटीस सेवा समाप्त करण्याच्या वेळेस दिली नाही किंवा एका महिन्याचे वेतन प्रदान केले नाही, तरी देखील त्यामुळे सेवा समाप्ती विधिअग्राह्य होणार नाही, परंतु ते केवळ कर्मचाऱ्यास एका महिन्याचे वेतन मिळण्यास हक्कदार बनवेल. उच्च न्यायालयाने संचालक, तांत्रिक शिक्षण -विरुद्ध- जान मोहम्मद, [१९७५] ऑल एल. आर, पृष्ठ ८, या प्रकरणातील त्यांच्या आधीच्या निर्णयाचे अनुसरण करून हे मत व्यक्त केले आणि याचिका अनुमत केली.

अपीलकर्त्याच्या वतीने विद्वान काउन्सेल यांनी, व्यवस्थापकीय समिती, सोहनलाल उच्च माध्यमिक शाळा, -विरुद्ध- शिव दत्त गुप्ता, (१९७४) ए.एल.जे. पृष्ठ ४६५, या प्रकरणातील अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या पूर्ण न्यायपीठाने दिलेल्या निर्णयावर अवलंबून, बाजू मांडली की अधिनियमाचे कलम १६-जी (३) (ए) हे परिवीक्षाधीनाला देखील लागू होते आणि म्हणून, निरीक्षकाकडून मान्यता प्राप्त केल्यानंतर सेवा समाप्तीची नोटीस दिल्याशिवाय परिवीक्षाधीनाची सेवा समाप्त करता येऊ शकत नाही. त्याने आणखी सादर निवेदन केले की विनियम २५ हे एक महिन्याची नोटीस देणे किंवा त्या ऐवजी एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक करते. अपीलकर्त्याला एक महिन्याची नोटीस देण्यात आली नव्हती किंवा त्या ऐवजी एक महिन्याचे वेतन देण्यात आले नव्हते, त्यामुळे त्याची सेवा समाप्ती विधिअग्राह्य म्हणून ठरविण्यात आली पाहिजे. एस. डी. गुप्ता यांच्या प्रकरणात, जे दोन मुद्दे विचारार्थ उद्भवले ते म्हणजे परिविक्षाधीन शिक्षकाच्या

सेवेच्या समाप्तीची नोटीस जिल्हा शाळा निरीक्षकांने मान्यता देण्यापूर्वी बजावता येऊ शकेल किंवा कसे आणि दुसरे, म्हणजे प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थितीवरून, मान्यता देण्यापूर्वी केलेली सेवा समाप्तीची नोटीस बजावणी क्षमापित करता येऊ शकते किंवा कसे. अलाहाबाद उच्च न्यायालयाने निर्णय दिला की कलम १६-जी(३)(ए), जे उपबंधित करते की कोणत्याही प्राचार्याला, मुख्याध्यापकाला किंवा शिक्षकाला निरीक्षकाच्या लेखी पूर्व मान्यतेशिवाय, सेवेतून कार्यमुक्त केले जाऊ शकत नाही किंवा काढून टाकले जाऊ शकत नाही किंवा बडतर्फ केले जाऊ शकत नाही किंवा त्याला पदावनत करता येऊ शकत नाही किंवा वित्तलब्धीमध्ये कोणत्याही विभिन्नतेच्या अधीन केले जाऊ शकत नाही किंवा सेवेच्या समाप्तीची नोटीस बजावता येऊ शकत नाही, हे सर्वसाधारणपणे शब्दात मांडलेले असल्याने, सेवा समाप्तीच्या प्रत्येक प्रकरणाला लागू होते जेथे सेवा समाप्त करण्यापूर्वी एखादी नोटीस द्यावी लागते आणि म्हणून, ते परिवीक्षाधीनाला देखील लागू होते. त्या प्रकरणात, सेवा समाप्तीची नोटीस दिली होती आणि त्यामुळे, आवश्यक ती नोटीस न दिल्याने काय परिणाम होऊ शकतो याबाबतच्या प्रश्नाचा विचार उच्च न्यायालयाला करावयाचा नव्हता. त्यामुळे, एस. डी. गुप्ता यांच्या प्रकरणावर ठेवलेला भरवसा खरोखरच भलत्या ठिकाणी ठेवला आहे.

विद्वान काउन्सेल यांनी आमचे लक्ष वरिष्ठ अधीक्षक, आर. एम. एस. कोचीन –विरुद्ध- के. व्ही. गोपीनाथ, [१९७३] ३ एस. सी. सी. ८६७ = ए. आय. आर. (१९७२) एस. सी. १८७ मधील प्रकरणाकडेही वेधले, ज्यामध्ये या न्यायालयाने केंद्रीय सेवा (अस्थायी सेवा) नियम, १९६५ च्या नियम ५ (१) (बी) चे निर्वचन करून अस्थायी सेवेच्या समाप्तीचा परामर्श घेताना निर्णय दिला आहे कि सेवा समाप्ती परिणामक होण्यासाठी, सेवेची समाप्ती ही कर्मचाऱ्याला त्याला जे काही देय आहे ते प्रदान करण्यासह एकाच वेळी करावयास पाहिजे. त्या प्रकरणात जो नियम विचारार्थ आला तो खालीलप्रमाणे होता:

अस्थायी सेवेची समाप्ती -

(1) (ए) अस्थायी सरकारी कर्मचाऱ्याची सेवा, जो स्थायिवत सेवेत नाही आहे, कोणत्याही वेळेस सरकारी कर्मचाऱ्याद्वारा नियुक्ती प्राधिकाऱ्याला किंवा नियुक्ती प्राधिकार्याद्वारा सरकारी कर्मचाऱ्याला लेखी नोटीस द्वारा समाप्त करता येऊ शकेल.

(बी) अशा नोटीसचा अवधी एक महिना असेल.

मात्र अशा कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याची सेवा त्याच्या सेवेच्या समाप्तीच्या लगतपूर्वी ज्या दराने तो ते आहरण करत होता त्याच दराने नोटीसच्या अवधीसाठी, किंवा, यथास्थिती, ज्या अवधीसाठी अशी नोटीस एक महिन्यापेक्षा कमी पडते त्या अवधीसाठी त्याच्या वेतनाच्या रकमेच्या समतुलय रक्कम अधिक भत्ते त्याला प्रदान करून तात्काळ समाप्त करता येऊ शकेल. उक्त नियमाचा अन्वयार्थ लावून, या न्यायालयाने खालीलप्रमाणे मत व्यक्त केले:

"नियम ५ (१) (ए) सरकारला तसेच कर्मचाऱ्याला लेखी नोटीस द्वारा सेवा समाप्त करण्याचा अधिकार देतो. नियम १(बी) खाली अशा नोटीससाठी विहित केलेला अवधी एक महिना आहे. उपनियम (बी) चे परंतुक, तथापि, सरकारला एक अतिरिक्त अधिकार देते, ज्यामध्ये ते सरकारला नोटीसचा अवधी संपेपर्यंत कर्मचाऱ्यांस सेवेत ठेवून न घेण्याचा पर्याय देते; जर त्यांनी सेवा केव्हाही समाप्त करण्याची तशी निवड केली, तर त्याच्या सेवेच्या समाप्तीच्या लगतपूर्वी ज्या दराने तो ते आहरण करत होता त्याच दराने नोटीसच्या अवधीसाठी, किंवा, यथास्थिती, ज्या अवधीसाठी अशी नोटीस एक महिन्यापेक्षा कमी पडते त्या अवधीसाठी त्याच्या वेतनाच्या रकमेच्या समतुलय रक्कम अधिक भत्ते त्याला प्रदान करून सरकार तात्काळ तसे करू शकते. पुनरावृत्तीच्या जोखमीवर, आम्ही असे नमूद करू शकतो कि परंतुकातील परिणामक शब्द असे आहेत कि, "अशा कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याची सेवा त्याला जे देय आहे ते प्रदान करण्यासह तात्काळ समाप्त करता येऊ शकेल." थोडक्यात बाब सादर करावयाची असेल तर, सेवा समाप्ती परिणामक होण्यासाठी, सेवेची समाप्ती ही कर्मचाऱ्याला त्याला जे काही देय आहे

ते प्रदान करण्यासह एकाच वेळी करावयास पाहिजे. .................. नियम स्वतःला असे निर्वचन करून देत नाही की सरकारी कर्मचाऱ्यावर आदेश बजावलयानंतर लगेचच, त्याला देय असलेलया रकमेचे प्रदान केव्हा करायचे आहे याबाबतचा प्रश्न लक्षात न घेता, सेवा समाप्ती परिणामकारक होते.

नियमन २५ हा 'के. व्ही. गोपीनाथ' यांच्या प्रकरणात विचारार्थ आलेलया नियमासारखाच असलयाचे म्हणता येऊ शकते किंवा कसे याचा विचार आम्ही करण्यापूर्वी, या न्यायालयाच्या, यू. पी. राज्य -विरुद्ध-. दीनानाथ राय, दिनांक 11 ऑक्टोबर 1968 रोजी निर्णीत केलेला सी. ए. क्र. 1934/1968, (1969 सर्व्हिस लॉ रिपोर्टर 647 मध्ये प्रकाशित झालेला) या प्रकरणातील आधीच्या निर्णयाचा संदर्भ करणे आवश्यक आहे. त्या प्रकरणातही या न्यायालयाला अस्थायी सेवेतील सरकारी कर्मचाऱ्याची सेवा समाप्ती बाबतच्या नियमाचा अन्वयार्थ लावायाचा होता. तो खालीलप्रमाणे होता.

" (1) या विषयावरील कोणत्याही विद्यमान नियमात आणि आदेशात काहीही विरुद्ध अंतर्भूत असले तरी, अस्थायी सेवेतील सरकारी कर्मचाऱ्यांची सेवा कोणत्याही वेळेस सरकारी कर्मचाऱ्याद्वारा नियुक्ती प्राधिकाऱ्याला किंवा नियुक्ती प्राधिकाऱ्याद्वारा सरकारी कर्मचाऱ्याला लेखी नोटीस द्वारा समाप्त करता येऊ शकते.

(2) सरकारी कर्मचाऱ्याद्वारा नियुक्ती प्राधिकाऱ्याला किंवा नियुक्ती प्राधिकाऱ्याद्वारा सरकारी कर्मचाऱ्याला दिलेलया अशा नोटीसचा कालावधी एक महिना असेल, मात्र नियुक्ती प्राधिकाऱ्याने दिलेलया नोटीसच्या बाबतीत, नंतरचा नोटीसच्या या अवधीच्या संपूर्ण किंवा अंशतः भागासाठी, त्या ऐवजी वेतन देऊ शकेल. आणखी असे कि कोणतीही नोटीस न देता किंवा नोटीसच्या ऐवजी कोणतीही शास्ति देणे सरकारी कर्मचाऱ्यास आवश्यक न करता, कमी अवधीसाठी नोटीस स्विकारून सरकारी कर्मचाऱ्यास कार्यमुक्त करण्याची मुभा नियुक्ती प्राधिकाऱ्याला असेल.

या न्यायालयाने त्या नियमाचा अन्वयार्थ लावून खालीलप्रमाणे विचार व्यक्त केले:

"नियमात असे म्हटले नाही आहे की नोटीस जारी करताना रोखीने किंवा धनादेशाद्वारे वेतन द्यायला पाहिजे. सरकारे ज्या पद्धतीने चालवली जातात हे जाणून, हा हेतू नियम-तयार करणाऱ्या प्राधिकाऱ्याकडे निर्देश करणे कठीण होईल. यात मुळीच शंका नाही की सरकार कर्मचारी नोटीसच्या ऐवजी वेतन मिळण्यास हक्कदार होईल, परंतु हे सामान्य क्रमात होईल.

'दीनानाथ राय' यांच्या प्रकरणातील या निर्णयाचा या न्यायालयाद्वारा 'के. व्ही. गोपीनाथ' यांच्या प्रकरणात विचार करण्यात आला आणि खाली विचार व्यक्त करून भेद दाखविण्यात आला:

"यात काहीही शंका नाही कि त्या नियमाची भाषा नियम ५ च्या शब्दाशी काहीशी सारखी आहे, परंतु त्यात सारभूत फरक आहे. या नियमाचा अर्थ केवळ असा आहे की नोटीसच्या अवधीकरीता नोटीस बजावणीच्या ऐवजी, ३० दिवस किंवा त्या पेक्षा कमी दिवसांसाठी वेतन देता येईल. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर, वेतन केव्हा प्रदान करायचे याबाबत कोणतीही अट न घालता, नियम केवळ कर्मचाऱ्यास नोटीस च्या अवधीसाठी वेतन मिळण्यास हक्क देतो.

अशा तऱ्हेने न्यायालयाचे सातत्यपूर्ण मत आहे कि, जेथे नियम सेवा समाप्तीच्या नोटीसच्या ऐवजी वेतन देण्याची परवानगी देतो आणि वेतन केव्हा प्रदान करायचे याबाबत आणखी काही उपबंधित करत नाही, तेथे तो केवळ नोटीसच्या अवधीसाठी वेतन मिळण्याचा अधिकार कर्मचाऱ्यास देतो आणि नोटीसच्या अवधीसाठी वेतन देणे यास विधिग्राह्य सेवा समाप्तीची पूर्ववर्ती शर्थ म्हणून मानले जाऊ शकत नाही. परंतु जेव्हा अभिप्रेत अर्थाने देखील नियम उपबंधित करतो कि कर्मचाऱ्याला त्याला जे काही देय आहे ते प्रदान करण्यासह त्याचा सेवेची समाप्ती एकाच वेळी करावयास पाहिजे, तेव्हा त्या आवश्यकतेच्या पूर्ततेस विधिग्राह्य सेवा समाप्तीसाठी पूर्ववर्ती शर्थ म्हणून मानले गेले पाहिजे. नियम ५ (१) (बी) च्या परंतुकातील "वेतन प्रदान द्वारा सेवेची तात्काळ समाप्ती" हे शब्द लक्षात घेता, या न्यायालयाने निर्णय दिला कि वेतन देणे

हे सेवा समाप्ती करण्याच्या वेळेस देणे उद्देशीत होते आणि त्यास 'गोपीनाथ' यांच्या प्रकरणात ते ज्या नियमांशी संबधित होते तो नियम ५ (१) (बी) आणि 'दीनानाथ' यांच्या प्रकरणात ज्या नियमाचा विचार करण्यात आला तो नियम यांच्यातील सारभूत फरक म्हणून दाखवून दिले.

विनियम २५ चे नुसते वाचन केले तरी ते सूचित करते कि ते 'दिनानाथ' यांच्या प्रकरणात विचारार्थ आलेलया नियमांशी अधिक सारखे आहे. तो विनियम व्यवस्थापनास एकतर एक महिन्याची नोटीस देण्याचा किंवा त्या ऐवजी एक महिन्याचे वेतन देण्याचा पर्याय देतो. ते कसे प्रदान करायचे याची पद्धत किंवा वेळ उपबंधित करत नाही. अशा तऱ्हेने नियम केवळ अस्थायी कर्मचाऱ्याला किंवा परिवीक्षाधीनाला नोटीसच्या अवधीसाठी वेतन मिळण्याचा हक्क देतो. परिणामक सेवेच्या समाप्तीसाठी पूर्ववर्ती शर्थ म्हणून, नोटीसच्या ऐवजी एक महिन्याचे वेतन देणे असे विनियम २५ उपबंधित करत नाही असे आमचे मत आहे, त्यामुळे ज्या उपसंचालकांनी विरुद्ध दृष्टिकोन घेतला त्या उपसंचालकाचा आदेश रद्द करण्यात उच्च न्यायालय बरोबर होते. उच्च न्यायालयाने घेतलेला दृष्टिकोन योग्य आहे आणि त्यामुळे, हे अपील खारीज करण्यात येते.

तथापि, प्रकरणाची तथ्ये आणि परिस्थिती लक्षात घेता, खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

अपील खारीज.

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरीता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

.............